लोकमत

# जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे तीन विद्यार्थी पुणे येथील नामांकित कंपनीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ :** येथील जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांची टीसीएस पुणे या नामांकित कंपनीत निवड झाली आहे. सत्र २०२०-२१ मध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे कॅम्पस ड्राइव्ह सत्र सुरू होताच या विद्यार्थ्यांनी माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात उच्च स्थानी असलेल्या कंपनीत आपले स्थान निश्चित केले आहे. कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग शाखेतील प्रणव पाटील, दिव्या बोरा, हितेशा गोटेचा यांची या कंपनीत निवड झाली आहे.



प्रणव पाटील



दिव्या बोरा



हितेशा गोटेचा

टीसीएस ही एक भारतीय बहुराष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान सेवा, सल्लागार आणि व्यवसाय समाधान कंपनी असून, त्याचे मुख्यालय मुंबई येथे आहे. टाटा समूहाची ही सहायक कंपनी असून, ४६ देशांतील १४९ ठिकाणी कार्यरत आहे. भांडवली बाजाराच्या प्रमाणानुसार टीसीएस ही सर्वात मोठी भारतीय कंपनी आहे.

या कंपनीच्या नुकत्याच झालेल्या कॅम्पस ड्राइव्हमध्ये ॲप्टिट्यूड टेक्निकल व कोडिंग टेस्टद्वारे देशातील काही निवडक अभियांत्रिकी महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. टीसीएसतर्फे प्रामुख्याने टीसीएस डिजिटल व टीसीएस निन्जा या दोन प्रकारच्या चाचण्या घेतल्या जातात. कंपनीच्या या इंटरव्ह्यू प्रोसेसमध्ये सर्वप्रथम ॲप्टिट्यूड, टेक्निकल व कोडिंग टेस्ट घेतली जाते. यानंतर ग्रुप डिस्कशन, हॅकॅथॉन राऊंड, टेक्निकल इंटरव्ह्यू, पर्सनल इंटरव्ह्यू या फेऱ्या घेऊन त्याद्वारे अंतिम निवड केली जाते.

या चाचण्यांमध्ये जेडीआयईटीच्या सर्व शाखांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यात प्रामुख्याने कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग शाखेच्या निवड झालेल्या विद्यार्थ्यांना असिस्टंट सिस्टीम इंजिनिअर ट्रेनी या पदावर कंपनीच्या पुणे येथील कार्यालयात रुजू करून घेतले जाणार आहे. त्यांना तीन लाख ७० हजार रुपयांचे वार्षिक पॅकेज घोषित करण्यात आले आहे.